दिनांक ३०/०८/२०२१

# प्रसिध्दी पत्रक

**1) आलोसे श्री. कैलास तुळशीराम कुबेर, पद- तलाठी, सज्जा- राजाराय टाकळी, ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद, 2) श्री राजेश तावजी बांडे वय 40 वर्ष धंदा- रिक्षा चालक, रा. राधास्वामी कॉलनी, जटवाडा रोड, औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडुन 15,000/- लाचेची रक्कम स्विकृती केल्याने, ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे खुलताबाद,औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| आलोसे यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | **1)आलोसे श्री.कैलास तुळशीराम कुबेर, पद- तलाठी, सज्जा- राजेराय टाकळी, ता. खुलताबाद, जि.औरंगाबाद,रा.एन-12,सी/22,स्वर्ग हॉटेल समोर,हडको,औरंगाबाद**<br>**2)श्री राजेश तावजी बांडे वय 40 वर्ष धंदा- रिक्षा चालक, रा. राधास्वामी कॉलनी, जटवाडा रोड, औरंगाबाद** |
| लाच मागणी रक्कम | :- | 15,000/- रुपये |
| तपास अधिकारी | :- | श्रीमती रेश्मा सौदागर, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांच्या विरुध्द लागलेला शेतजमिनीच्या निकालांच्या संबंधाने तक्रारदार यांनी मा.हायकोर्टात अपील दाखल केलेले असल्यामुळे तक्रारदार यांच्या विरोधी पक्षकाराच्या नावे लागलेल्या निकालांच्या आधारे फेर न घेण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांची राजाराय टाकळी येथे शेतजमीन आहे. सदर शेत जमिनीचे प्रकरण महसुल मंत्रालय, मुंबई येथे चालु होते. सदर प्रकरणात दिनांक 19/07/2021 रोजी तक्रारदार यांच्या विरुध्द सदर प्रकरणाचा निकाल लागला. त्यानंतर तक्रारदार यांनी लागलेल्या निकालाच्या विरुध्द मा. हायकोर्ट औरंगाबाद येथे दिनांक 23/08/2021 रोजी अपील दाखल केलेले आहे. त्याबाबत तक्रारदार यांनी मा.हायकोर्ट औरंगाबाद येथे दाखल केलेले अपील प्रकरणाची प्रत दिनांक 27/08/2021 रोजी तहसीलदार, खुलताबाद व श्री कुबेर तलाठी, सज्जा- राजाराय टाकळी यांना दिली होती. दिनांक 28/08/2021 रोजी मंडळ अधिकारी, खुलताबाद जि.औरंगाबाद यांना सुध्दा प्रत दिलेली आहे.<br>परंतु तक्रारदार यांच्या विरुध्द दिनांक 19/07/2021 रोजी महसुल मंत्रालय, मुंबई येथे लागलेल्या निकालाचा अनुषंगाने विरोधी पक्षकारांच्या नावे फेरफार नोंद न घेण्यासाठी तलाठी श्री.कुबेर हे तक्रारदार यांच्याकडे सदर कामाचे 25,000/- रुपये लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली.<br>सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, **श्री कैलास कुबेर, तलाठी सज्जा- राजाराय टाकळी** यांनी तक्रारदार यांच्याकडे 25,000/- रुपये लाचेची मागणी केली..<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज रोजी सापळा आयोजीत केला असता, आलोसे श्री. कैलास तुळशीराम कुबेर, तलाठी, सज्जा- राजाराय टाकळी यांनी लाचेची 15,000/- रुपये रक्कम स्वत: स्विकारुन खाजगी आरोपी श्री राजेश तावजी बांडे वय 40 वर्ष धंदा- रिक्षा चालक, रा. राधास्वामी कॉलनी, जटवाडा रोड, औरंगाबाद यांच्याकडे दिली. सदरची लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर दोन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पोलीस स्टेशन खुलताबाद, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा.डॉ.राहुल खाडे, प्रभारी अपर पोलीस अधीक्षक मा.रुपचंद वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीमती रेश्मा सौदागर यांनी कारवाई केली आहे. त्यांना सदरच्या कारवाई कामी पोना- प्रकाश घुगरे, राजेंद्र सिनकर, अशोक नागरगोजे, चालक पोलीस अमंलदार चंद्रकांत शिंदे यांनी मदत केली आहे.

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना अवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.**

**संपर्क पत्ता** :- **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद**
**ई- मेल** :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
**ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन** :- **acbmaharashtra.net**
**संपर्क क्रं.** :- **0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,**
**पोलीस अधीक्षक** :- **8888807299**
**अपर पोलीस अधीक्षक** :- **9970022257**

Saudagar
**(रेशमा सौदागर)**
**पोलीस निरीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग**
**औरंगाबाद**